महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते

Government Of Maharashtra

Office of the Director General of Police, Maharashtra State

Maharashtra State Police Headquarters, Shahid Bhagat Singh Marg, Colaba, Mumbai 400 001

क्र. पोमसं/९(NGO)/९७२७/सन्मानचिन्ह/२७८/२०२१/२०२२, -।।४। मुंबई, दि. २८/१२/२०२३

संदर्भ: १) पोलीस महासंचालक कार्यालयाचे परिपत्रक क्र. विशा/१५/९७२७, दि. ३०/४/१९९२.
२) शासन निर्णय, गृह विभाग क्र. पीएमडी/१२९०/२२४४/प्र.क्र.९१/पोल-१, दि. २२/०७/१९९२.
३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/विशा/१०/९७९७/स.चिन्ह/२००२, दि. १७/१/२००२.
४) शासन निर्णय, गृह विभाग क्र. पीएमडी/१२०७/प्र.क्र.८७, पोल-१, दि. १०/०७/२००७.
५) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/विशा(१०)/९७२७/सन्मानचिन्ह/१९९२/२०१०, दि. ११/६/२०१०.
६) शासन निर्णय गृह विभाग क्र. पीएमडी - १२१२ / प्र. क्र. १६६ / पोल- १, दि. २९/०४/२०१६.
७) शासन निर्णय गृह विभाग क्र.पीएमडी-०६१७/प्र.क्र.४३/पोल-१, दि. १३/०४/२०१७.

**विषय:- महाराष्ट्रातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सन-२०२३ करिता प्रशंसनीय सेवेबद्दल पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करण्याबाबत...**

*****

**परिपत्रक**

महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्रशंसनीय / गुणवत्तापूर्ण सेवेसाठी संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे निर्धारीत केलेली ८०० सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र दरवर्षी १ मे रोजी प्रदान करण्यात येतात.

महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील खालील नमूद प्रवर्गामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या शिफारसी मागविण्यात येत आहेत.

| प्रवर्ग क्र. | तपशील |
|---|---|
| १. | a) ज्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांची लागोपाठ तीन वेळा राज्य शासनाने शिफारस केल्यानंतरही राष्ट्रपती पोलीस पदक / पोलीस पदक प्रदान करण्यात आलेले नसेल, अशा पोलीस अधिकारी व अंमलदारांना...<br>b) ज्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र मिळण्यापूर्वी राष्ट्रपती पोलीस पदक / पोलीस पदक (उल्लेखनीय सेवेचे / गुणवत्तापुर्ण सेवेचे / शौर्य पदक) मिळाले असेल त्यांना पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात येईल. |
| २. | दरोडेखोर / गुन्हेगारांच्या टोळ्या किंवा अघोर व तंत्रबद्ध गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांच्या विरुद्ध केलेली कारवाई. |
| ३. | सर्व प्रकारच्या सनसनाटी व कठीण गुन्ह्यांचा यशस्वीपणे शोध लावून तपास करणे.<br>(मागील २ वर्षाच्या आतील कामगिरी असणे आवश्यक आहे.) |
| ४. | नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदतकार्य करणे. |
| ५. | जनतेच्या समस्या सोडवून पोलीसांची प्रतिमा उजळ करणे. |
| ६. | राष्ट्रीय स्तरावरील खेळांत प्रावीण्य दाखविणे. |
| ७. | पोलीसांच्या कामात सुधारणा घडविण्याकरिता कार्यवाहीत आणता येतील अशा सूचना करणे. |
| ८. | **१५ वर्षाच्या सेवेचा अभिलेख उत्तम राखल्याबद्दल म्हणजेच -**<br>१) कमीत कमी १०० बक्षिसे मिळालेली असावीत.<br>२) मागील १० वर्षाच्या **(सन २०१३-१४ ते २०२२-२३)** गोपनीय अहवाल / सेवापटात कमीतकमी ५ शेरे अतिउत्कृष्ट किंवा उत्कृष्ट (Outstanding/Very Good) मिळविलेले असावेत.<br>३) सन **२०१३-१४ ते २०२२-२३** या कालावधीतील प्रतवारी मागील दहा वर्षामध्ये एकही शेरा **"ब"** नसावा.<br>४) कोणत्याही प्रकारची मोठी शिक्षा नसावी व बेशिस्तीच्या वर्तनाची नोंद नसावी.<br>५) कोणत्याही प्रकारची चौकशी / विभागीय चौकशी / कोर्ट केस प्रलंबित /प्रस्तावित नसावी. |
| ९. | पोलीस मोटार परिवहन विभागातील चालक वर्गाने अपघात न करता २० वर्षाचा अभिलेख उत्तम ठेवल्याबद्दल. |
| १०. | विशेष शाखेत (प्रशिक्षण संस्था धरुन) पाच वर्षे उत्तम कामगिरी केल्याबद्दल. |
| ११. | प्रशंसनीय स्वरुपाचे अन्य दृश्य व अत्युत्तम काम केल्याबद्दल. |

**वर नमूद प्रवर्गामध्ये शिफारसी करतांना घटक प्रमुखांनी खालील नमूद मुद्दे विचारात घ्यावेत. :-**

१. शिफारस करण्यात येणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे सेवातपशीलाची माहिती विहीत केलेल्या नमून्यामध्ये सादर करावी (Annexure-I).

२. शिफारस करण्यात येणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे सचोटीची माहिती (Integrity Certificate) विहीत केलेल्या नमुन्यामध्ये सादर करावे (Annexure - A).

३. शिफारस करण्यात येणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांना यापुर्वी सदरचे सन्मानचिन्ह मिळाले नसल्याचे प्रमाणपत्र विहीत केलेल्या नमुन्यामध्ये सादर करावे (Annexure - B).

४. प्रवर्ग ९ मध्ये चालक अंमलदारांनी २० वर्षात अपघात केला नसल्याबाबत प्रमाणपत्र विहीत नमुन्यात सादर करावे. (Annexure C)

५. प्रवर्ग २, प्रवर्ग ३, प्रवर्ग ५, प्रवर्ग ७, प्रवर्ग १० व प्रवर्ग ११ मध्ये केलेल्या कामगीरीची / उल्लेखनीय कामाची आवश्यक माहिती अवतरणामध्ये नमूद करून त्याची खातरजमा संबंधीत घटक प्रमुखांनी करावी.

६. प्रवर्ग ४ मध्ये प्रस्ताव सादर करतांना जीवन रक्षा पदकासाठी शिफारस करूनही मंजूर झाले नसेल अशांचीही शिफारस करण्यात यावी.

७. प्रवर्ग ६ मध्ये ज्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस सेवेत लागल्यानंतर राष्ट्रीय / अंतराष्ट्रीय स्तरावर पदक प्राप्त केले असेल अशा खेळाडूंचीच सन्मानचिन्हासाठी शिफारस करावी. सोबत वैद्य पदक मिळाल्याचे प्रमाणपत्र अवतराणासोबत जोडावे. राज्य स्तरावरील पदक प्राप्त खेळाडू, तसेच अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळावा व महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळाव्यातील पदक प्राप्त कर्मचारी यांच्या शिफारसी करू नयेत.

७a. खालील नमूद प्रवर्गामध्ये अवतरण सादर करतांना खालील बाबींचा सुध्दा समावेश करावा.

a) प्रवर्ग ३: अवतरणासोबत FIR ची प्रत जोडावी. घटनेचा दिनांक व घटना स्थळ नमूद करावा, तसेच केंद्रीय गृह मंत्रालय यांचे उत्कृष्ट तपास पदक मिळाले असल्यास त्याची माहिती द्यावी.

b) प्रवर्ग ४: अवतरणामध्ये घटना घडल्याचा दिनांक, ठिकाण आणि घटनेची थोडक्यात माहिती द्यावी. जीवन रक्षा पदक मिळाले असल्यास त्याची माहिती द्यावी.

c) प्रवर्ग ६: अवतरणामध्ये खेळाचा प्रकार / प्रतियोगीता स्तर / पदक केव्हा मिळाले व कोणते पदक मिळाले याची माहिती द्यावी.

d) प्रवर्ग १०: अवतरणामध्ये विशेष शाखेचे नाव (उदा. राज्य गुप्तवार्ता विभाग / गुन्हे अन्वेषण विभाग / प्रशिक्षण संचलनालय / दहशतवाद विरोधी पथक / फोर्स वन / लाचलुचपत प्रतिबंधक विभाग / महामार्ग सुरक्षा पथक / नागरी हक्क संरक्षण ई.) नमूद करावे. विशेष शाखेतील एकूण काम केल्याचा कालावधी आणि कामगिरीची माहिती अवतरणामध्ये थोडक्यात नमूद करावी.

८. गोपनीय अहवालातील मागील १० पैकी ३ वर्षाचे शेरे उपलब्ध नसल्यास त्यापुर्वीचे ३ वर्षाचे गोपनीय अहवाल सादर करावेत. ३ पेक्षा जास्त वार्षिक गोपनीय अहवालातील शेरे उपलब्ध नसतील अशा अधिकारी व अंमलदार यांचे प्रस्ताव पाठविण्यात येवू नये.

९. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/विशा/१०/९७२७/स.चिन्ह/२००२, दि. १७/१/२००२ अन्वये प्रवर्ग ८ मध्ये पोलीस बिनतारी संदेश, राज्य राखीव पोलीस बल व मोटार परिवहन विभागातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना किमान ५० बक्षिसे मिळालेली असावीत.

१०. एकूण ८०० सन्मानचिन्हापैकी २० टक्के म्हणजेच १६० सन्मानचिन्हे चकमकीमध्ये जखमी झालेल्या, अतिरेक्याविरूध्द व नक्षलवाद्यांविरूध्द केलेल्या कारवाईमध्ये सामील झालेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यासाठी राखीव ठेवण्यात येतील, अशा पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे प्रस्ताव पाठवितांना त्यांनी केलेल्या कामगिरीचा थोडक्यात (२०० शब्दाच्या आत) तपशील देण्यात यावा.

११. नमुना-I (Annexure-I) मधील रकाना १० मध्ये एकच प्रवर्ग नमूद करावा. जर पोलीस अधिकारी व अंमलदार हे एकापेक्षा जास्त प्रवर्गासाठी पात्र ठरत असेल तर इतर प्रवर्गाची माहिती रकाना ११ मध्ये नमूद करावी. प्रवर्गनिहाय सन्मानचिन्हे मंजूर करतांना प्रामुख्याने रकाना १० मध्ये नमूद प्रवर्गाच्या अनुषंगाने प्रकरणाची छाननी करण्यात येईल. रकाना १० मध्ये नमूद प्रवर्गात बसत नसल्यास इतर प्रवर्गाचा गुणवत्तेनुसार विचार करण्यात येईल.

१२. रकाना १२ मध्ये प्रतवारी नमूद करतांना फक्त (OS (Outstanding), VG (Very Good), G (Good), AV (Average), NIC (Non Initiating Certificate, ADV (Adverse), MS (Missing), NA (Not applicable)) असे नमूद करावे. सन २०१७ पुर्वी ACR मध्ये ६ प्रकारची प्रतवारी (स्तंभ १ ते ३) मध्ये दर्शविल्याप्रमाणे देण्यात येत होती. शासन निर्णय क्र. सीएनफआर-१२११/प्र.क्र.२५७/तेरा, दि. २/२/२०१७ आणि शुध्दीपत्रक दि. १०/१०/२०१७ नुसार फक्त ४ प्रकारची प्रतवारी (स्तंभ ४ व ५) मध्ये दर्शविल्याप्रमाणे देण्यात येत आहे. (पोलीस अधिकाऱ्यांसाठी सन २०१३-१४ ते २०२२-२३ असे वित्तीय वर्ष व पोलीस अंमलदारांसाठी सन २०१४ ते २०२३ असे वर्ष गणण्यात यावे).

| सन २०१७ पुर्वी देण्यात येणारी प्रतवारी | | | सन २०१७ नंतर देण्यात येणारी प्रतवारी | सन २०१७ नंतर देण्यात येणारे गुणांकन | Annexure १ च्या अ.क्र. १२ मध्ये भरावयाची प्रतवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| Outstanding / Excellent | अतिउत्कृष्ट | A+ | A+ | ८ to १० | OS |
| Very Good / Very Well | उत्कृष्ट / अतिउत्तम | A | A | ६ to ७.९ | VG |
| Positively Good | निश्चित चांगला / उत्तम | B+ | B | ४ to ५.९ | G |
| Well / Good / Satisfactory / In turn | चांगला / समाधानकारक / पाळीप्रमाणे | B | | | |
| Average/High enough | साधारण | B- | C | ० to ३.९ | AV |
| Below Average | साधारणपेक्षा कमी | C | | | |

१३. सन्मानचिन्ह धारकावर भविष्यात कोणत्याही न्यायालयाकडून नैतिक अध:पतनाच्या प्रकरणी दोषसिध्द होऊन शिक्षा झाल्यास, त्यामुळे पोलीस दलाची प्रतिमा कलंकित होणारी असल्यास, तसेच पोलीस दलाच्या शिस्तीला बाधा आणणाऱ्या कोणत्याही वर्तनावरून सन्मानचिन्ह धारकास सेवेतून बडतर्फ केल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास, या कार्यालयाचे परिपत्रक दि. ११/६/२०१० मध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे सन्मानचिन्ह काढून घेण्यात येईल. संबंधीत घटक प्रमुखांनी अशाप्रकरणी सविस्तर व स्वयंस्पष्ट शिफारस असलेला अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयास सादर केल्यावर या कार्यालयाच्या स्तरावर अंतिम निर्णय घेण्यात येईल.

१४. घटक प्रमुखांनी शिफारस केलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे एकत्रीत प्रस्ताव एकदाच त्यांचे संबंधीत परिक्षेत्रीय विभागाकडे / घटकाकडे सेवापुस्तक व गोपनीय अहवालासह विहीत मुदतीत पाठवावे.

१५. संबंधीत परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक / पोलीस आयुक्त / अपर पोलीस महासंचालक यांनी त्यांचे अधिपत्याखालील घटकांचे सन्मानचिन्हासाठी शिफारस करण्यात आलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या सेवापुस्तक / वार्षिक गोपनीय अहवालांची तपासणी करून विहीत अटी व शर्तींची पुर्तता करणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेच प्रस्ताव शिफारसीसह एकत्रित करून दि. ३१/१/२०२४ पुर्वी एकदाच विहीत केलेल्या वेळेत पाठवावे.

१६. माहितीची सॉफ्टकॉपी (Word Document in Rich Text Format [.rtf]) मध्ये ईमेलद्वारे / पेन ड्राईव्हमध्ये पाठवावे. प्रस्ताव पाठवितांना त्यांचे सेवापुस्तक व गोपनीय अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयात पाठविण्यात येवू नये.

१७. सदरील परिपत्रक पोलीस विभागाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर Flash या लिंकवर उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(संजीव कुमार सिंघल)
अपर पोलीस महासंचालक (आस्था),
पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई यांचेकरिता

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा., मुंबई
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म.राज्य, मुंबई
पोलीस महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक, म.राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (मुंबईसह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा., पुणे / प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई / फोर्स वन, मुंबई / नागरी हक्क संरक्षण, म.रा., मुंबई/ वाहतूक म.रा., मुंबई /राज्य राखीव पोलीस बल म.रा., मुंबई /विशेष कृती
संचालक, पोलीस समन्वय व दळणवळण, म. रा., पुणे
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, वडाची वाडी, पुणे
सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक/ पोलीस उप महानिरीक्षक परिक्षेत्रिय / महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, म.राज्य मुंबई / मोटार परिवहन पुणे / रा.रा.पो.बल पुणे / नागपूर / नक्षल विरोधी अभियान, नागपूर/ सायबर सेल, मुंबई
सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हा / रेल्वे / बिनतारी संदेश)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र
प्राचार्य, गुन्हा अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
प्राचार्ये, अपारंपारीक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर

पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष, पोमसं कार्यालय, म. रा., मुंबई

२. सदर परिपत्रक **३१/०१/२०२४** पर्यंत पोलीस विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावे.

# Annexure - I

| | | |
|---|---|---|
| १. | पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पुर्ण नाव | नाव ________ वडील / पती नाव ________ आडनाव ________ |
| २. | पदनाम | |
| ३. | नेमणूकीचे ठिकाण व जिल्हा | |
| ४. | सेवेत दाखल झाल्याची तारीख, तेव्हाचे पदनाम | |
| ५. | दि. ३०/४/२०२४ रोजी पर्यंतची एकूण सेवा | |
| ६. | सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| ७. | सेवा कालावधीत मिळालेली बक्षिसांची एकूण संख्या | |
| ८. | मागील १० वर्षांमध्ये मिळालेल्या शिक्षांची एकूण संख्या | सौम्य शिक्षा =<br>गंभीर शिक्षा = |
| ९. | शिक्षा सुरू असल्यास त्याचा तपशील | |
| १०. | सन्मानचिन्हासाठी शिफारस केलेला प्रवर्ग | |
| ११. | सन्मानचिन्हासाठी अतिरिक्त प्रवर्ग असल्यास | |
| १२. | गोपनीय अहवालाच्या १० वर्षांची शेऱ्यांची केलेली प्रतवारी | सन<br>१) २०१३-१४ २०१४ ________<br>२) २०१४-१५ २०१५ ________<br>३) २०१५-१६ २०१६ ________<br>४) २०१६-१७ २०१७ ________<br>५) २०१७-१८ २०१८ ________<br>६) २०१८-१९ २०१९ ________<br>७) २०१९-२० २०२० ________<br>८) २०२०-२१ २०२१ ________<br>९) २०२१-२२ २०२२ ________<br>१०) २०२२-२३ २०२३ ________<br>* वरील कालावधीतील गोपनीय अहवाल उपलब्ध नसल्यास २०१०-११, २०११-१२, २०१२-१३ चे नमूद करावे. |
| १३. | अवतरण | जास्तीत जास्त २०० शब्द. |

घटक प्रमुखांची स्वाक्षरी, नाव, पदनाम

**Annexure -A**

# सचोटी प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, ______________________________

हुद्दा______________________ नेमणूक ____________________________________ यांना

१) मागील १० वर्षात कोणतीही मोठी शिक्षा दिलेली नाही.

२) विभागीय चौकशी / प्राथमिक चौकशी प्रस्तावित नाही किंवा प्रलंबीत नाही.

३) गुन्हा तपासाधीन किंवा न्यायप्रविष्ठ नाही.

**(घटक प्रमुखांची स्वाक्षरी, नाव व हुद्दा)**

**Annexure -B**

# प्रतिज्ञालेख

मी ____________(पूर्णनाव) प्रतिज्ञालेख लिहून देतो/देते की, माझा पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह यापूर्वी मला मिळालेले नाही. तसे निष्पन्न झाल्यास मी स्वत: जबाबदार राहील.

(सही)
(पूर्ण नाव)
(पदनाम व सध्याची नेमणूक)

दिनांक:-

ठिकाण:-

**Annexure -C**

# प्रतिज्ञालेख

मी (पूर्णनाव)___ प्रतिज्ञालेख लिहून देतो/देते की, माझा २० वर्षाच्या सेवा कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारचा अपघात घडून आलेला नाही. तसे निष्पन्न झाल्यास मी स्वत: जबाबदार राहील.

(सही)

दिनांकः-

(पूर्ण नाव)

ठिकाण:-

(पदनाम व सध्याची नेमणूक)